# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर

(नॅक समिती तर्फे अ' दर्जा प्राप्त)

## वित्त व लेखाविभाग

विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००४ (महाराष्ट्र)
तार :- बामुसीटी
Web Site - www.bamu.ac.in
E-mail :- financeoffice@bamu.ac.in

वित्त व लेखाधिकारी (नं.) :-२४०३३००
फॅक्स :-२४०३२९९
लेखाधिकारी (नं.) :-२४०३१२४
उप. उपकुलसचिव (लेखा) (नं.) :- २४०३१५५
सहा. कुलसचित (अंकेक्षन) (नं.) :-२४०३१२५
(दुरध्वनी कार्यालय(लेखा):अनुदान २४०३१२६,रोख २४०३१२७,देयक २४०३१२८,वेतन २४०३१२९ रोजकीर्द ०२४०३१३० प्रकाशन ०२४०३१३१)

## परीपत्रक

सर्व शैक्षणिक, प्रशासकीय विभागप्रमुख तसेच संशोधन मार्गदर्शक यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या खरेदी समितीची बैठक दिनांक ११.०३.२०२४ रोजी संपन्न झाली सदर बैठकीत दि. ०३.११.२०२३ चा बैठक इतिवृत्तांत कायम करतांना खालील ठरावात दुरुस्ती करण्यात येवून दि. ०३.११.२०२३ चे कार्यवृत्त कायम करण्यात आले.

खरेदी समितीच्या शिफारशीकरीता प्राप्त होणाऱ्या व खरेदी समितीने शिफारस केल्या नंतर ज्या साहित्याची खरेदी मोठ्या प्रमाणावर (उच्चतम दरांची वैज्ञानिक उपकरणे, स्थावर विभागा मार्फत खरेदी करण्यात येणारे उच्चतम दराचे साहित्य व इतर उच्चतम दराची खरेदी) याची पडताळणी खरेदी समितीच्या किमान दोन सदस्यांनी करावी. तसेच संबंधीत दोन सदस्यांत साहित्य खरेदीच्या तांत्रिकबाबी पडताळणी करणारा सदस्य नसेल तर तांत्रिक बाबींची माहिती असणाऱ्या सदस्यांचा समावेश करुन खरेदीची पडताळणी करावी. खरेदी समिती सदस्यांनी मान्यता दिल्यानंतर देयक अदायगी बाबतची कार्यवाही करावी.

**उपरोक्त ठरावात दुरुस्ती करुन ज्या साहित्याची खरेदी, खरेदी समितीच्या शिफारशीनूसार होते व ज्याचे दर हे रु.३.०० लक्ष व त्यावरील खरेदी, देखभाल दुरुस्ती, सेवा इ. करीता असतील त्याच्या खरेदीचे देयक अदा करण्यापुर्वी किमान दोन सदस्यांच्या स्वाक्षरी घ्याव्यात.**

तरी सर्व शैक्षणिक, प्रशासकिय तसेच संशोधन मार्गदर्शक यांनी खरेदी समितीच्या ठरावानुसार उपकरणे/साहित्याच्या खरेदीची देयके सादर करणेपुर्वी उपरोक्त दुरुस्ती ठरावानूसार कार्यवाही करावी.

**खरेदी समितीत आजरोजी खालील प्रमाणे सदस्य आहेत.**

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| ०१ | प्रा.(डॉ.) विजय फुलारी | मा. कुलगुरु तथा अध्यक्ष |
| ०२ | प्रा. (डॉ.) पी.एस. वक्ते | मा. प्र. कुलगुरु |
| ०३ | डॉ. गजानन सानप | मा. कुलपती नामनिर्देशित, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, सदस्य |
| ०४ | अॅड. दत्ता भांगे | मा.व्यवस्थापन परीषद सदस्य, सदस्य |
| ०५ | प्रा. राजेश रगडे | विभागप्रमुख, पर्यटनशास्त्र विभाग, सदस्य |
| ०६ | डॉ. अपर्णा अष्टपुत्रे | विभागप्रमुख, मानसशास्त्र विभाग, सदस्य |
| ०७ | श्री मनिष बी. वीर | सदस्य, सिनि. मॅनेजर, बडवे इंजिनिअरिंग |
| ०८ | डॉ. प्रशांत अमृतकर | प्र. कुलसचिव, सदस्य |
| ०९ | श्रीम. एस.बी. जंपावाड | वित्त व लेखाअधिकारी तथा सचिव |

खरेदी समिती सदस्यांचा कालावधी संपल्यास अथवा काही बदल झाल्यास याबाबत संकेतस्थळावर परीपत्रकाव्दारे कळविण्यात येईल हे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर ][
संदर्भ क्र. वित्त व लेखा/अनुदान/२०२६/ ११२४ ][
दिनांक:- ०२/०९/२०२६ ][

**वित्त व लेखाअधिकारी**

**********

**प्रतिलीपी:-**

१) मा. कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
२) मा. प्र कुलगरुंचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. प्र कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
३) शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर व उपपरिसर धाराशिव यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव (शैक्षणिक विभागप्रमुखांनी आपल्या विभाग अंतर्गत असलेल्या सर्व संशोधन मार्गदर्शक यांच्या निदर्शनास आणून द्यावे).
४) मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर धाराशिव यां ना माहितीसतव आणि योग्य त्या कार्यवाहीसतव अग्रेषित.
५) मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. कुलसचिवांच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित
६) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव.
७) संचालक, यु.एन.आय.सी. यांना देवून कळविण्यात येते की विद्यापीठ संकेतस्थळावर सदरील परिपत्रक प्रसिध्द करावे.
८) अंतर्गत लेखा परीक्षक, वित्त व लेखा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यांना माहितीस्तव.
९) कक्ष अधिकारी, (देयक कक्ष, विद्यापीठ निधी आणि देयक कक्ष (अनुदान कक्ष)